# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०७/०८/२०२४

**<u>प्रेसनोट</u>**

दिनांक ०६/०८/२०२४ रोजी मायलन फार्मसीटिकल व वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने महासभा सभागृह, विरार पूर्व येथे खाजगी वैद्यकीय विभागामधील व महानगरपालिका अंतर्गत कार्यरत डॉक्टर यांना औषधास दाद न देणारा क्षयरोग (DRTB) या संदर्भात मार्गदर्शन करणेकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

सदर कार्यशाळेचे उदघाटन मा. उपायुक्त श्री. समीर भूमकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी क्षयरोगाचे उच्चाटन करणेकरिता खाजगी व सरकारी वैद्यकीय संस्था यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक असल्याचे व या साठी सामाजिक माध्यमे (Social Media) यांचा प्रभावी वापर करण्याचे मा. उपायुक्त श्री समीर भूमकर यांनी सांगितले व या एकत्रीकरणासाठी सबळ प्रयत्न करण्याचे आश्वाशन मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी दिले.

कार्यशाळेच्या सुरुवातीला शहर क्षयरोग अधिकारी डॉ. राजेश चौहान यांनी मान्यवरांचे स्वागत करून राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमाविषयी माहिती दिली तसेच खाजगी व सरकारी दोन्ही माध्यमातील डॉक्टर यांनी क्षयरोग निर्मुलनासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. तदनंतर खाजगी डॉ. राजेश ढोले यांनी क्षयरोग औषधोपचार व त्या संदर्भात आवश्यक बाबींची महत्वपूर्ण माहिती सादर केली. तसेच डॉ. अवतांश त्रिपाठी यांनी औषधास दाद न देणारा क्षयरोग (DRTB), त्यासंबंधीत औषधोपचार व ते देत असताना येणा-या विविध समस्या यांच्या संबंधी महत्वपूर्ण माहिती दिली.

याप्रसंगी जागतिक आरोग्य संघटना सल्लागार डॉ. नेहा नलावडे यांनी उपस्थित राहून भारत देश, महाराष्ट्र व वसई विरार शहर महानगरपालिका यांची राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमा मधील सद्यस्थिती व त्यामधील आवश्यक योगदान यासंदर्भात आकडेवारी दर्शवून आवश्यक मार्गदर्शन केले.

सदर कार्याशाळेची सांगता करताना शहर क्षयरोग अधिकारी डॉ. राजेश चौहान यांनी उपस्थित मान्यवर, खाजगी व महानगरपालिका डॉक्टर, मायलन फार्मसीटिकल तसेच अन्य सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**